**ठळक बातम्या**

- राज्यातल्या सर्व प्रमुख धरणांमधे गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाणीसाठा,  मोसमी पाऊस येत्या तीन-चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या कार्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून गौरव

- नव्या चेहऱ्यांना संधी देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची पदाचा राजीनामा देण्याची तयारी

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत युतीचा निर्णय स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांशी चर्चा करुन घेण्याची अजित पवार यांची घोषणा

**आणि**

- बँका, शेअर्समधली दावा न केलेली रक्कम गुंतवणूकदारांना परत करण्यासाठी वेगवान मोहिम राबवण्याचे केंद्रीय अर्थमंत्र्यांचे आदेश

**<><><><>**

राज्य मंत्रिमंडळानं आजच्या बैठकीत आज पाऊस, पीकपाणी, धरणाच्या जलाशयांमधला पाणी साठा, इत्यादींचा आढावा घेतला. राज्यातल्या सर्व प्रमुख धरणांमधे गेल्या वर्षीच्या तुलनेत चांगला पाणीसाठा असल्याची माहिती जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी यावेळी दिली. राज्यात पंधरा जूननंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असं आवाहन कृषि विभागानं केलं आहे. या बैठकीत कृषि विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी राज्यातलं पीकपाणी, पेरण्या, खतपुरवठा याबाबत सादरीकरणाव्दारे माहिती दिली.

राज्यातल्या सतरा जिल्ह्यात पंचवीस टक्क्यापेक्षा कमी, बारा जिल्ह्यात पंचवीस ते पन्नास टक्के, चार जिल्ह्यांत पन्नास ते पंच्याहत्तर टक्के तर एका जिल्ह्यात शंभर

टक्क्याहून अधिक पाऊस झाला आहे. राज्यातल्या विविध विभागांत खते आणि बियाणे यांचा सुरळीत पुरवठा झाला आहे. अनेक भागात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, असं त्यांनी सांगितलं.

मोसमी पाऊस येत्या तीन-चार दिवसांत पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता आहे, अशी माहिती कुलाबा वेधशाळेच्या संचालक शुभांगी भुते यांनी सादरीकरणाद्वारे दिली. मध्य महाराष्ट्रात बारा जूनला, तर मराठवाड्याच्या काही भागात बारा ते चौदा जून दरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकणात बारा आणि पंधरा जून दरम्यान मुसळधार, तर १३ आणि १४ जून रोजी अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात तेरा ते पंधरा जून दरम्यान मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

विविध प्रकारच्या मद्यावरच्या उत्पादन शुल्कात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारनं आज घेतला. त्यानुसार भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याकरता, प्रति बल्क लिटर २६० रुपयांपर्यंत निर्मिती मूल्य घोषित केलेल्या मद्यावरच्या उत्पादन शुल्काचा दर, निर्मिती मूल्याच्या तीनपटीवरुन साडे चारपट केला जाणार आहे. तर देशी मद्यावरच्या उत्पादन शुल्काचा दर प्रति प्रुफ लिटर २०५ रुपये केला जाणार आहे. १८० मिलीलीटर बाटलीच्या किरकोळ विक्रीची किंमत नव्या धोरणानुसार बदलली आहे. यानुसार देशी मद्याची किंमत ८० रुपये, महाराष्ट्र मेड लिकरची किंमत १४८ रुपये, भारतीय बनावटीचं मद्य २०५ रुपये, तर विदेशी मद्याच्या प्रीमियम ब्रँडची किंमत ३६० रुपये इतकी असेल.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या बळकटीकरणासाठी ७४४ नवीन पदं आणि पर्यवेक्षीय स्वरूपाची ४७९ पदं अशा १ हजार २२३ पदांच्या सुधारित आकृतीबंधालाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे.

**<><><><>**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा देण्यासंबंधी विधेयक आगामी विधिमंडळ अधिवेशनात आणण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. राज्यात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आयोग असे दोन वेगवेगळे आयोग निर्माण करण्यात आले आहेत.

त्याचप्रमाणे शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात ६ हजार २५० रुपयांची वाढ, पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात १० हजार रुपयांची वाढ, तसंच बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात ८ हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णयही आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला.

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं सरकार गतीशील आणि निर्णयक्षम सरकार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात सुरू असलेल्या विकासकामांचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला. केंद्र सरकारने महाराष्ट्रात रेल्वेसाठी भरीव तरतूद केली असंही मुख्यमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री ( २९ सेकंद)**

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारच्या गेल्या अकरा वर्षाच्या कार्यकाळात झालेल्या विकासयात्रेचा लाभ महाराष्ट्राला मिळाला, हे महाराष्ट्राचं भाग्य आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. समृद्धी महामार्ग, मुंबई मेट्रो, बुलेट ट्रेन प्रकल्प, किनारी महामार्ग, अटल सेतू अशा महत्त्वाच्या प्रकल्पांमुळे महाराष्ट्र समृद्ध झाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात गतीमान प्रगती झाली, असं शिंदे म्हणाले.

**<><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा देण्याची तयारी दाखवली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी नव्या चेहऱ्यांना संधी द्यावी अशी विनंती त्यांनी केली. पुण्यात आयोजित पक्षाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात ते बोलत होते. सात वर्षांपासून ते प्रदेशाध्यक्ष आहेत.

आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर लक्ष केंद्रीत करा. या निवडणुकीत ५० टक्के महिलांना निवडून आणा. राज्य चालवणारं नवीन नेतृत्व निर्माण करण्यासाठी काम करा असं आवाहन शरद पवार यांनी यावेळी उपस्थितांना केलं.

**<><><>**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत युती करण्याचा निर्णय स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांशी चर्चा करुन घेतला जाईल असं आश्वासन उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी दिलं. पुण्यात झालेल्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. पक्षाच्या कार्यकर्त्यांना त्यांनी १ कोटी सदस्य नोंदणीचं लक्ष्य दिलं. कट्टरतावाद पक्षाला कधीही मान्य नव्हता आणि यापुढेही मान्य नसेल, असं ते म्हणाले.

**<><><>**

बँकांच्या ठेवी, लाभांश, शेअर्स यामध्ये गुंतवणूक केलेल्या पण दावा न केलेल्या मालमत्ता पात्र गुंतवणूकदारांना देण्यासाठी वेगवान प्रक्रीया राबवण्याचे आदेश केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिले आहे. आर्थिक स्थिरता आणि विकास परिषदेच्या बैठकीत त्या मुंबईत बोलत होत्या. विविध वित्तीय संस्थांनी यासाठी एकत्रित प्रयत्न करावे आणि जिल्हापातळीवर मेळावे घ्यावे, असं त्या म्हणाल्या. वित्तीय क्षेत्रात KYC प्रक्रिया सुलभ करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

**<><><>**

नाशिक जिल्ह्यातल्या श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर इथून निवृत्ती नाथांची पालखी आषाढी वारीसाठी आज पंढरपूरकडे रवाना झाली. २७ दिवस पायी प्रवास करून आषाढी एकादशीला पंढरपूरला पोचणाऱ्या या पालखीत शेकडो दिंड्या आणि हजारो स्त्री पुरुष वारकरी भगवी पताका आणि तुळशी वृंदावन घेऊन सहभागी झाले आहेत. पालखीचा आजचा मुक्काम त्र्यंबकेश्वर परिसरातल्या गहिनीनाथांच्या समाधी जवळ असेल. उद्या सकाळी ही पालखी नाशिककडे रवाना होईल.

**<><><>**

जालना तालुक्यातल्या वरुड इथं आज सकाळी शेतात काम करत असताना विजेचा धक्का लागून एका तरुण शेतकऱ्याचा त्यांचा दोन मुलांसह मृत्यू झाला.

**<><><>**

National Common Mobility Card चं अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयात आज केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यावेळी उपस्थित होते. NPCI आणि स्टेट बँकेच्या सहकार्यानं मुंबई मेट्रो ३ नं हे कार्ड तयार केलं आहे.

**<><><><>**

मुंबई महानगर क्षेत्रातल्या प्रवाशांना सिटी बसचा एकसंध प्रवास करता यावा आणि एकाच तिकिटावर करता यावा यासाठी राज्य सरकारनं समिती स्थापन केली आहे. बेस्टचे महाव्यवस्थापक या समितीचे अध्यक्ष असून महानगर क्षेत्रातल्या महापालिकांचे आयुक्त सदस्य आहेत.

**<><><><>**

येत्या २ दिवसात कोकण, मराठावाडा आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे.

**//<><><><>//**